# कार्यावली

## सोमवार, दिनांक ३० जून, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनाची कार्यावली.

**एक** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**दोन** : प्रश्नोत्तरे

**तीन** : सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**चार** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**पाच** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**सहा** : शासकीय विधेयके

**सात** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

आठ : शोक प्रस्ताव

नऊ : इतर प्रस्ताव

दहा : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये

अकरा : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये

बारा : **अशासकीय विधेयके - विचारार्थ -**

(१) सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२३ - **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे**

(२) सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२३ - **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे**

(३) सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र राज्यातील युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२३ - **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे**

(४) सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ - **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे**

(५) सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२३ - **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे**

(६) सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ - **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे**

## तेरा : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२) -

**श्री. सुनिल शिंदे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १, २, ३ व ४**

(१) "राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२) "केंद्र शासनाच्या अखत्यारीतील दादर येथील इंदू मिल्सच्या जागेवर महामानव परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, सदरहू निर्णयामुळे महाराष्ट्र शासनाची कीर्ती देशभरातच नव्हे तर पूर्ण जगभरात पसरलेली आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील छत्रपती श्री शाहू महाराज यांचे इतिहासातील योगदान अमुल्य आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे जन्मलेल्या छत्रपती शाहू महाराज यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात केलेले काम अभूतपूर्व आहे, त्यांच्या या कामाची महती भावी पिढीस होणे गरजेचे आहे, यास्तव राज्य शासनाने केंद्र शासनाच्या अखत्यारीतील इंदू मिल्सच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्यदिव्य स्मारकाच्या धर्तीवर मुंबईतील ना. म. जोशी मार्ग व वरळी येथील सीताराम, पोद्दार व अपोलो मिल्स या केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बंद गिरण्यांपैकी एका गिरणीच्या जागेवर छत्रपती शाहू महाराजांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३) "राज्यात विशेषतः मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई व इतर प्रमुख शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली लक्षणीय वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतूकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास, परिणामी वाहतूकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे."

(४) "राज्यात मुंबईसह इतर शहरांतील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढ, सदनिकांच्या किंमतीत मूळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने होत असलेल्या वाढीमुळे शहरात सदनिका विकत घेणाऱ्या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या स्वप्नपूर्तीत निर्माण होत असलेला अडसर, त्यामुळे सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याबाबत सर्वसामान्य जनतेकडून होत असलेली आग्रही मागणी, तदनुषंगाने सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्याकरिता राज्य शासनाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सत्यजीत तांबे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६, ७, ८, ९ व १०**

(६) "राज्यात मुख्यतः शाळांमध्ये अंमली पदार्थाची वाढत असलेली विक्री व अंमली पदार्थाचा महाविद्यालयातील युवकांमध्ये होत असलेला प्रसार व त्यामुळे विद्यार्थी जीवनावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेऊन याबाबत शासनाने शाळा तसेच महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता मोहीम सुरू करून अंमली पदार्थांच्या विक्रीवर आळा बसविण्यासाठी कडक कारवाई व उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७) "राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९) "महाराष्ट्र राज्यात युवक व क्रीडा कल्याण खाते कार्यरत असून क्रीडा विभागाचे अधिकारीच युवक कल्याण विभागाचे काम पाहत असतात. या विभागांमध्ये युवक कल्याण योजना अत्यंत मर्यादित असून पुरेशा प्रमाणात निधी सुद्धा उपलब्ध करून दिला जात नाही. त्यामुळे युवक कल्याण विभागाची स्वतंत्र आस्थापना निर्मिती करून प्रत्येक जिल्ह्यात युवक माहिती केंद्र स्थापन करून त्याद्वारे व्यापक योजना राबवून युवकांना शिक्षण, उद्योजकता, नोकरी, जीवनशैली, नाविन्यता याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी समिती नेमण्याबाबत अशी शिफारस ही विधान परिषद शासनाला करीत आहे."

(१०) "राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे वाढलेले भाव लक्षात घेता राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानांतून रास्त भावाने आणि योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे"

**श्री. अमोल मिटकरी वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १७, १८, १९ व २०**

(१७) "राज्यातील किल्ले व दुर्ग यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ले व दुर्गांचे जतन संवर्धन करुन सदरहू परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे व दुर्गांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या आणि किल्ल्यांची झालेली दुरवस्था थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१८) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१९) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२०) "राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त होत नाहीत, सेवायोजन कार्यालयाकडून नोकरीसाठी मुलाखतपत्रही प्राप्त होत नाहीत, परिणामी बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले आहे, म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पूढील ३ वर्षात नोकरी न मिळालेल्या बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमाह रुपये ५०००/- बेरोजगारी भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्रीमती उमा खापरे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २६, २७, २८, २९ व ३०**

(२६) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२७) "राज्यात अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील दूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदी काठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छीमार बांधवांच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषणाच्या समस्येवर उपाय शोधून शासनाने प्रभावीरीत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२८) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२९) "राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३०) "पुणे महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांच्या पुनर्बांधणी संदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जीवित, वित्त हानी होण्याचे प्रमाण वाढत आहे. जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची योग्यरीत्या पाहणी न करणे तसेच वाड्यांच्या पुनर्रचनेची प्रलंबित असलेली

अनेक कामे त्यामुळे पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरिकांची मागणी होत आहे. यासंदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**ॲड. निरंजन डावखरे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३१, ३२, ३३, ३४ व ३५**

(३१)

''राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३२) ''राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण अधिकतम वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३३) ''राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३४) ''राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३५) ''पालघर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यासह किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे पाणी खारेपाणी शेत जमिनीत शिरून मालमत्तेचे झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांचे व लोकांच्या मालमत्तेचे होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने किनारपट्टीवरील जिल्ह्यातील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कार्याबद्दल कार्यक्रम आखून त्यांची त्वरित अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे''

**श्री. वसंत खंडेलवाल वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३६, ३७, ३८ व ३९**

(३६) "राज्यात तालुका स्तरावरील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आर्थिक भुर्दंड ही सोसावा लागू नाही. यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रमातून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे"

(३७) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३८) "राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका यांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे"

(३९) "राज्यातील किल्ले व दुर्ग यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ले व दुर्गांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे व दुर्गांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या, त्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या आणि किल्ल्यांची झालेली दुरवस्था थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. विक्रम काळे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४७, ४८, ४९, ५० व ५१**

(४७) "राज्यात मोठ्या प्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या, दैनंदिन अपघातांचे वाढते प्रमाण, त्यामुळे होणारी जीवितहानी हे टाळण्यासाठी तसेच वेळ व इंधनाची बचत आणि विकासाच्या दृष्टीने राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्यमार्ग तसेच जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे रस्ते हे चौपदरी करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४८) "राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत आहे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासन स्तरावर उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४९) "राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी

शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५०) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५१) "राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना घ्यावयाचे सर्व माध्यमातील शिक्षण हे अधिक परिणामकारक, प्रभावी होण्यासाठी आणि भविष्यात सक्षम पिढी उभी राहण्यासाठी सर्व शिक्षण विभाग (शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, आश्रमशाळा, अंध, अपंग, मूक-बधिर शाळा, आदिवासी आश्रम शाळा) हे मंत्रालयातील एकाच विभागाच्या अधिपत्याखाली आणावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. प्रसाद लाड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५२, ५३, ५४, ५५ व ५६**

(५२) "महाराष्ट्रात अनेक नद्यांचा उगम होत असून या नद्यांच्याव्दारे पाण्याचा स्रोत मोठया प्रमाणावर उपलब्ध होत असल्याने अनेक गावे सिंचनाखाली येत असून त्या परिसरातील गावे सुजलाम-सुफलाम होणे, अनेक शहरात देखील पुरेसा पाणीपुरवठा होत असल्याने उद्योगधंद्यात देखील वाढ होत असणे, सद्यस्थितीत अनेक ठिकाणी सिमेंटचे रस्ते बांधकाम होत असणे, अनेक नदी पात्राजवळ अवैध अतिक्रमणांमुळे या नद्यांचे पात्र कमी होत असणे, या नद्यांमध्ये गावातील तसेच शहरातील घाण व दुषित पाणी सोडण्यात येणे तसेच सिमेंटीकरणामुळे अनेक नद्यांची उगमस्थाने नष्ट होत असणे, अनेक ठिकाणी पाण्याचा नैसर्गिक स्रोत बंद करुन तेथे अवैध बांधकामे करण्यात येणे, नद्यांच्या नैसर्गिक स्रोतांचे जतन करून नद्यांच्या संवर्धनाकरिता पाण्याचे सनियंत्रण, तसेच अवैध अतिक्रमण रोखण्यासाठी शासनाने निश्चित धोरण तयार करुन त्याची कठोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(५३) "मुला-मुलींना लहानाचे मोठे केल्यानंतर या मुलांकडून आपल्या आई-वडीलांची सतत अवहेलना अपमान करण्यात येत असणे, म्हातारपणी मुलगा/मुलगी आपला आधार आहे, अशी भोळी भाबडी आशा बाळगून आई-वडील आपल्या मुला-मुलींना कोणतीही गोष्ट कमी पडून देत नसणे, म्हातारपणी मुले आई-वडीलांची सेवा सुश्रुषा न करता त्यांना वृध्दाश्रमात अथवा इतरत्र सोडून देत असणे अथवा अपमानीत करून घराच्या बाहेर काढत असणे, आयुष्याच्या शेवटी मुला-सूनांकडून त्यांना योग्यप्रकारे वागणूक मिळत नसणे, म्हातारपणी मुलांनी आपल्या आई-वडीलांचा योग्यरित्या सांभाळ करावा त्यांची सेवा सुश्रूषा करावी याकरिता शासनाने निश्चित धोरण ठरवावे, अशी शिफारस हो विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५४) "राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५५) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५६) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. राजेश राठोड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५७, ५८, ५९ व ६०**

(५७) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५८) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत जोडणी मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युतपंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या ऊस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५९) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६०) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहेत, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अभिजित वंज़ारी वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६२, ६३, ६४, ६५ व ६६**

(६२) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६३) "राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६४) "राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविलेले असताना त्याबाबतचे लाभ ज्येष्ठ नागरीकांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांच्या हितासंबंधी धोरण ठरवून जनजागृती होण्याच्या दृष्टीने ज्येष्ठ नागरीकांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन (मदतकेंद्र) व संकेतस्थळ सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६५) "विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६६) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनांचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्यामुळे विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रलंबित काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६७, ६८, ६९, ७० व ७१**

(६७) "मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी इमारती, मॉल, खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात झाली. परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटूंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोकऱ्यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैंकी विहित हिस्सा महानगरपालिका, म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महानगरपालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि, बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्षे गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देणे याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बाऊंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६८) "मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किंमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६९) "भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ अन्वये राज्यातील मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या धर्तीवर कोकण प्रदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याबाबत राज्य शासनाने कार्यवाही करुन त्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७०) "राज्यात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करुन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७१) "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. धीरज लिंगाडे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७२, ७३, ७४, ७५ व ७६**

(७२) "विदर्भातील अमरावती विभागात विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या विभागात अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम व बुलढाणा इत्यादी जिल्ह्यांचा समावेश आहे. अमरावती येथे या पाचही जिल्ह्यांसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विद्यापीठ असून या विद्यापीठात वाशिम, अकोला व बुलढाणा या भागातील लाखों विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता अमरावती येथे दिडशे किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरुन प्रवास करुन विद्यार्जनासाठी जावे लागते, परिणामी त्यांचे श्रम, वेळ व पैसा खर्ची जात असतो, या भागातील लाखों

विद्यार्थ्यांची अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांकरीता बुलढाणा येथे “संत गजानन महाराज” या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी असणे, या भागात शैक्षणिक बाबींचे जलदगतीने संनियंत्रण व नियोजन होण्याच्या दृष्टीने बुलढाणा येथे उपरोक्त तीन जिल्ह्यांकरिता “संत गजानन महाराज” या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(७३) ”राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(७४) “राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(७५) ‘’राज्यातील अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी समित्यांनी दिलेल्या निर्णयाला फक्त उच्च न्यायालयातच अपिल करता येत असल्याने अनेक प्रकरणे निर्णय देताना हेतुपुरस्पर, पुर्वग्रह दूषितपणे जाणीवपूर्वक विरोधात दिले गेल्याचे मा.उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार सिध्द होत असून अनेक प्रकरणी जात पडताळणी समित्यांना लाखांवर दंड, समज व निर्णय समितीच बरखास्त केल्याचे मा.उच्च न्यायालयाने/ मा.सर्वोच्च न्यायालयाचे शास्ती म्हणून आहे. जातपडताळणी समित्या त्यांचे निर्णय काही विवक्षित कारणामुळे मोठ्या प्रमाणात बदलत असल्याचे निदर्शनास येत असल्याने संपूर्ण आदिवासी समाजात जात पडताळणी समितीचे कामकाज पक्षपातीपणे होत असल्याचा जनक्षोभ मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. खरा लाभार्थी वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये म्हणून राज्य शासनाने राज्यातील अनुसूचित जमातीच्या जातपडताळणी समित्यांवर न्यायाधिशांची नेमणूक करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.‘’

(७६) “राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. जयंत आसगावकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७७, ७८, ७९ व ८०**

(७७) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७८) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७९) "राज्यात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करुन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८०) "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सुधाकर अडबाले वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८२**

(८२) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटाना तोंड देण्यासाठी व बाधित नागरीकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ८३, ८४, ८५ व ८६**

(८३) "राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी

खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८४) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८५) "शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते, त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८६) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपधातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. प्रज्ञा सातव वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ८९, ९० व ९१**

(८९) "राज्यात विशेषत: मराठवाड्यात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ करावयाच्या कायमस्वरुपी उपाययोजना, मराठवाड्यात शेतीसाठी शाश्वत सिंचन अभियान सुरु करुन मराठवाड्यातील सिंचनाचा जलआराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९०) "राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९१) "राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अंबादास दानवे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ९५, ९६ व ९७**

(९५) "राज्यातील मोठ्या व मध्यम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने निश्चित स्वरुपाचा एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९६) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटाना तोंड देण्यासाठी व बाधित नागरीकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपतग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९७) "मराठवाडा क्षेत्रात अवर्षणामुळे व सिंचनाच्या पुरेशा सोयी उपलब्ध नसल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, या क्षेत्रातील ७५ टक्के उद्योगधंदे बंद असणे, उत्पन्नाची साधने नसल्याने खालावत असलेले जीवनमान, पुरेशा आरोग्य सुविधा, शिक्षण सुविधा यांचा अभाव, परिणामी, मराठवाड्याचा मानव विकास निर्देशांक राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत निम्म्यापेक्षाही कमी असल्याचा जाहीर करण्यात आलेला अहवाल विचारात घेता मराठवाडयातील मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी उपाययोजना अंमलात आणण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. संदीप जोशी वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १००**

(१००) "राज्यातील क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी होत असणे. या विभागामार्फत युवक व क्रीडा क्षेत्रासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना मर्यादित स्वरूपाच्या असून सदर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपलब्ध होणारा निधी अपूरा असणे, त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर असलेल्या तरुणांना योग्य दिशा संधी आणि सहाय्य मिळत नसणे. युवकांना शिक्षण, रोजगार, उद्योजकता, जीवनशैली सुधारणा, नाविन्यता, व्यक्तिमत्व विकास यादी विविध बाबतीत सक्षमपणे मार्गदर्शन मिळेल अशा केंद्रामार्फत शासकीय योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, करिअर प्लॅनिंग, क्रीडा संधी, उद्योजकतेचे प्रशिक्षण, स्कील डेव्हलपमेंट इत्यादी सेवा तरुणांना एकाच छताखाली उपलब्ध होतील. म्हणूनच, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात युवकांसाठी सर्वसमावेशक माहिती व मार्गदर्शन देणारी "युवक व क्रीडा कल्याण माहिती केंद्र" तातडीने स्थापन करण्यात यावीत आणि त्यासाठी आवश्यक विधेयक, संरचना व निधी सुनिश्चित करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सदाशिव खोत वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १०१, १०२ व १०३**

(१०१) "राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा.अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१०२) "राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१०३) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. शशिकांत शिंदे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १०५ व १०७**

(१०५) "राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१०७) "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**चौदा** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा.

**पंधरा** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी अंतिम कार्यावली सोबत जोडण्यात येईल.)

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ३० जून, २०२५.**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव - १,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.